**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 4, Apr - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 01/04/2021 Accepted on : 14/04/2021 Publication Date: 15/04/2021

# “उच्च शिक्षणातील बदलते स्वरूप अपेक्षा आणि आव्हाने”

**डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे**
**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख**
**श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. औरंगाबाद**
Email - wawgesavita@gmail.com

**सारांश**: आजचे शतक हे ज्ञानाचे आणि ज्ञानाधिष्ठित संपत्तीचे शतक आहे. आणि त्या ज्ञानातून संपत्ती निर्माण करून घेण्याच्या क्षमतेला महत्त्व प्राप्त झालेले आहे. आणि ही क्षमता वाढविण्यासाठी फक्त शिक्षण मदत करू शकते. काळानुसार बदलणारी आणि गुणवत्तेच्या कसोटीवर उतरणारी शिक्षणव्यवस्था ही आजची खरी गरज आहे. त्याचप्रमाणे ज्ञानाच्या कक्षाही रुंदावत आहे. विकसित देशांमध्ये उच्च शिक्षणाबरोबरच संशोधनाला खूप महत्त्व दिले आहे. त्याचबरोबर त्या पद्धतीने यंत्रणेचा सांगाडा भरभक्कम करून दिला जातो, त्यामुळे देश नवनवीन ज्ञान निर्माण करतात आणि त्या ज्ञानापासून मूल्यवर्धित वस्तूत रूपांतर करतात, अशा वस्तूंच्या व्यापारातून आर्थिक विकास साधला जातो. आणि या मुळेच आज प्रगत आणि विकसित देशांमध्ये ज्ञान आणि संपत्ती त्यांच्यामध्ये एक वेगळे नाते निर्माण झालेले दिसून येते. या उलट ज्या देशांमध्ये शिक्षणाला व संशोधनाला महत्त्व न देता इतर गोष्टीला महत्त्व दिले जाते त्या देशांमध्ये शिक्षण आणि संशोधनाच्या अभावामुळे ज्ञाननिर्मितीच होत नाही. आणि ज्ञानातून निर्माण होणारी संपत्तीचा तर मग विचारच करायला नको म्हणून आजच्या या ज्ञानाच्या युगात जे देश श्रीमंत आहेत ते अधिक श्रीमंत होत आहेत आणि जे देश गरीब आहेत ते अधिक गरीब होत आहेत. अशा श्रीमंत व गरीब देशातील दरी आणखीच रुंदावत चालली आहे.

आजच्या या शतकामध्ये शिक्षणपद्धती व शिक्षणव्यवस्था यामध्ये अमुलाग्र बदल होताना दिसून येतात. विसाव्या शतकाच्या अखेरीस संगणक, संदेश व दळणवळण आणि संप्रेषण विज्ञान त्यांच्याशी निगडीत असलेल्या तंत्रज्ञानात क्रांती घडून आली अशा या वैज्ञानिक आणि तांत्रिक बदलामुळे शिक्षणामध्ये लवचिकता आली व त्या शिक्षणाचा उपयुक्ततेत व गुणवत्तेत वाढ झाली. शिक्षणाची व्याप्ती, तिची चौकट आणि तिचे मापदंड बदललेले आहेत. शिक्षणाचे एकाच वेळी वैश्वीकरण आणि जागतिकीकरण होत आहे. शिक्षण, ज्ञान, ज्ञानातून संपत्तीची निर्मिती आणि त्यातून निर्माण होणारे अर्थकारणाचे वैश्वीकरण असे नवीनच अभिसरण होऊन लागले आहे. या सर्व गोष्टींचा आढावा घेतांना असे लक्षात येते की, आपल्या देशातील शिक्षण सुविधांचा आपण आता विचार करणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणाचा मागोवा घेणे गरजेचे आहे.

**मुख्यशब्द:** उच्चशिक्षण, स्वरूप, अपेक्षा, आव्हान, सम्यक दृष्टी, वैश्वीकरण, अभिसरण, संप्रेषण, दळणवळण, सृजनशील, मूल्यवर्धित.

## १. प्रस्तावना:

आजच्या या शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षणा बाबतीत वेगवेगळ्या प्रकारे विचार करण्यात येत आहे. आपण घेतो ते शिक्षण खरंच उपयोगाचे आहे का? हा सर्वांना भेडसावणारा प्रश्न आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे सर्वांचीच शिक्षण क्षेत्राविषयी नाराजी आणि निराशा व्यक्त होताना दिसते. असे असले तरी आपल्याकडे ही नवनवीन प्रयोग आणि सुधारणा करण्याची धडपड सातत्याने चालू असते. आणि त्यात प्रामुख्याने शिक्षकांचा सहभाग असतो. आणि असायलाही पाहिजे, कारण आजच्या शिक्षणाविषयी काही प्रमाणात नाराजीचे सूर निघतात त्याला कारणे आहेत. कारण आज एखादी पदवी घेऊन तुम्ही जेव्हा विद्यापीठातून बाहेर पडता तेव्हा तुम्हाला तुमच्या नोकरीची शाश्वती नसते. आणि ती लगेच मिळाली तरी तुम्ही ज्या ज्ञानाची परीक्षा देऊन पदवी मिळवलीत त्या ज्ञानाचा तुम्हाला किती उपयोग होईल याची शंका तुमच्या मनात असते. अशा प्रकारची चर्चा आज सर्वत्र होताना दिसते. तसेच आज जगातल्या विविध क्षेत्रामध्ये संशोधन होत आहे. मग आपण त्यामध्ये कोठे आहोत, आज भारतात शिकायचं म्हटलं तरी पाहिजे त्या क्षेत्रात आपल्याला प्रवेश मिळेलच असे नाही. प्रवेश मिळाला तर प्राध्यापक शिक्षक चांगले मिळतीलच असे नाही. आणि सर्व शिकून जरी बाहेर पडलो तरी त्या शिक्षणाचा उपयोग करायला संधी मिळेलच असेही नाही. त्यासाठी आवश्यक ती साधनसामुग्री, आवश्यक त्या सुविधा मिळतीलच याची खात्री मात्र मुळीच नाही. तेव्हा इथल्या उच्च शिक्षण क्षेत्रावर होणारा सर्व खर्च हा अनाठायी व निरुपयोगी आहे. अशा भावना समाजाच्या आणि सरकारच्याही मनात काही प्रमाणात निर्माण होत आहेत. एकीकडे उच्च शिक्षण क्षेत्रातील खर्चात कपात करण्याविषयी बोललं जातं तर दुसरीकडे आर्थिक बजेट सांभाळणे अशक्य ठरत. आणि अशा असंख्य प्रश्नांची काहूर समाजाच्या

मनात निर्माण होत आहे. त्यांची झालेली ती कोंडी फोडणे गरजेचे आहे. आणि ही कोंडी फोडायची असेल तर त्यासाठी आपल्याला शिक्षण क्षेत्रात विशिष्ट पद्धतीने काम करणे गरजेचे आहे. आणि तसे प्रयत्न हे काही विद्यापीठामार्फत सुरू आहेत. ज्या विद्यापीठामार्फत असे प्रयत्न जे सुरू आहेत त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या राष्ट्रांच्या विकासाचे मूळ कारण काय? याचा शोध घेतला ज्या देशाकडे शिक्षण आणि कौशल्यावर प्रभुत्व असेल त्या देशात मनुष्यबळाचे साधन हे विपुल आणि तो देश वेगाने विकसित होतो असे दिसून आले.

## २. उच्चशिक्षणातील बदलते स्वरूप:

आजचे शतक हे ज्ञानाचे आणि ज्ञानाधिष्ठित संपत्तीचे शतक आहे. आणि त्या ज्ञानातून संपत्ती निर्माण करून घेण्याच्या क्षमतेला महत्त्व प्राप्त झालेले आहे. आणि ही क्षमता वाढविण्यासाठी फक्त शिक्षण मदत करू शकते. काळानुसार बदलणारी आणि गुणवत्तेच्या कसोटीवर उतरणारी शिक्षणव्यवस्था ही आजची खरी गरज आहे. त्याचप्रमाणे ज्ञानाच्या कक्षाही रुंदावत आहे. विकसित देशांमध्ये उच्च शिक्षणाबरोबरच संशोधनाला खूप महत्त्व दिले आहे. त्याचबरोबर त्या पद्धतीने यंत्रणेचा सांगाडा भरभक्कम करून दिला जातो, त्यामुळे देश नवनवीन ज्ञान निर्माण करतात आणि त्या ज्ञानापासून मूल्यवर्धित वस्तूत रूपांतर करतात, अशा वस्तूंच्या व्यापारातून आर्थिक विकास साधला जातो. आणि या मुळेच आज प्रगत आणि विकसित देशांमध्ये ज्ञान आणि संपत्ती त्यांच्यामध्ये एक वेगळे नाते निर्माण झालेले दिसून येते. या उलट ज्या देशांमध्ये शिक्षणाला व संशोधनाला महत्त्व न देता इतर गोष्टीला महत्त्व दिले जाते त्या देशांमध्ये शिक्षण आणि संशोधनाच्या अभावामुळे ज्ञाननिर्मितीच होत नाही. आणि ज्ञानातून निर्माण होणारी संपत्तीचा तर मग विचारच करायला नको म्हणून आजच्या या ज्ञानाच्या युगात जे देश श्रीमंत आहेत ते अधिक श्रीमंत होत आहेत आणि जे देश गरीब आहेत ते अधिक गरीब होत आहेत. अशा श्रीमंत व गरीब देशातील दरी आणखीच रुंदावत चालली आहे.

आजच्या या शतकामध्ये शिक्षणपद्धती व शिक्षणव्यवस्था यामध्ये अमुलाग्र बदल होताना दिसून येतात. विसाव्या शतकाच्या अखेरीस संगणक, संदेश व दळणवळण आणि संप्रेषण विज्ञान त्यांच्याशी निगडीत असलेल्या तंत्रज्ञानात क्रांती घडून आली अशा या वैज्ञानिक आणि तांत्रिक बदलामुळे शिक्षणामध्ये लवचिकता आली व त्या शिक्षणाचा उपयुक्ततेत व गुणवत्तेत वाढ झाली. शिक्षणाची व्याप्ती, तिची चौकट आणि तिचे मापदंड बदललेले आहेत. शिक्षणाचे एकाच वेळी वैश्वीकरण आणि जागतिकीकरण होत आहे. शिक्षण, ज्ञान, ज्ञानातून संपत्तीची निर्मिती आणि त्यातून निर्माण होणारे अर्थकारणाचे वैश्वीकरण असे नवीनच अभिसरण होऊ लागले आहे. या सर्व गोष्टींचा आढावा घेताना असे लक्षात येते की, आपल्या देशातील शिक्षण सुविधांचा आपण आता विचार करणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणाचा मागोवा घेणे गरजेचे आहे.

## ३. उच्चशिक्षणातील अपेक्षा:

भारतीय शिक्षण पद्धतीचा विचार करताना असे दिसून येते की, भारतीय उच्च शिक्षणास दोनशे वर्षाची परंपरा आहे कलकत्यात 1817 साली स्थापन झालेले हिंदू कॉलेज आणि त्यानंतर 1857 ला निर्माण केलेल्या मुंबई, कलकत्ता आणि मद्रास येथील विद्यापीठांच्या काळापासून आजच्या जगभर मान्यता प्राप्त झालेल्या आय.आय.एम.,आय.आय.टी.आणि तत्सम शिक्षण संस्थांच्या काळापर्यंत आपली शिक्षण व्यवस्था पुढे आलेली आहे. ब्रिटिशांनी शिक्षणाची जरी मुहूर्तमेढ रोवली तरी त्यामध्ये समाजाचे हित नव्हते तर त्यामध्ये सरकारचा स्वार्थ दिसून येतो. भारतीय जनता आणि इंग्रज सरकार यांच्यात दुवा निर्माण करणारा नोकर वर्ग निर्माण करणे हा त्यांचा महत्त्वाचा उद्देश होता. आणि प्रशिक्षित नोकरवर्ग त्यांच्या व्यवस्थापनाचा कणा होता. ब्रिटिशांनी त्यांच्या विद्यापीठात असलेले संशोधन पद्धती भारताच्या विद्यापीठांमध्ये कधीही रुजविली नाही. संशोधनातून ज्ञाननिर्मिती करणाऱ्या संस्कृतीची जाणूनबुजून उपेक्षा करण्यात आली आणि त्याचे दुष्परिणाम स्वातंत्र्योत्तर काळात पडत गेले. शिक्षणाकरिता शिक्षण ही प्रवृत्ती वाढत गेली आणि उच्च शिक्षण व संशोधन यांच्यात सक्रीय व सकारात्मक दुवा कधीच निर्माण झाला नाही. राधाकृष्ण कमिशन, कोठारी कमिशन यानंतर आलेल्या प्रत्येक अहवालामध्ये संलग्नतेची चौकट मोडून काढण्याबाबत, वर्गात दिले जाणारे शिक्षण आणि बाहेरील जगात मिळणारा व्यवहारिक अनुभव यांच्यात सांगड घालण्याबाबत तसेच ज्ञाननिर्मितीची आस असणारे संशोधन करण्याबाबत सखोल विश्लेषण आणि त्यावर उपाय दिल्याचे आढळते. परंतु प्रत्यक्षात मात्र सर्व काही वेगळेच घडल्याचे दिसते.

01 जून 2020 रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अहवालानुसार आज देशात जवळपास 54 केंद्रीय विद्यापीठे, 411 राज्य विद्यापीठे,आणि 123 मानद विद्यापीठे असल्याचे मानले जातात. त्याच बरोबर राष्ट्रीय महत्व प्राप्त 138 संस्था आहेत. तरीही त्यातून दरवर्षी निर्माण होणारे साडेतीन लाख पदवीधर नोकरी देणे योग्य आढळत नाहीत. आजच्या घडीला जवळ जवळ एक कोटी विद्यार्थी आणि साडेचार लाख शिक्षक उच्चशिक्षण यंत्रणेत आहेत, म्हणजे आज फक्त दहा टक्केच विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतात. ज्या देशाची लोकसंख्या कोटीच्या घरात आहे त्या देशाची प्रगती ही आज आपल्यासमोर येऊन उभी राहते. आज अमेरिकेत अडीच हजारांच्या वर विद्यापीठे आहेत तर चीनमध्ये 2000 विद्यापीठे आहेत. प्रगत देशात संलग्नता ही संकल्पनाच अस्तित्वात आहे. तेथील

प्रत्येक संस्था शैक्षणिक, आर्थिक आणि व्यवस्थापकीय कामात स्वायत्त असते तिला पदवी देण्याचे कायदेशीर अधिकार असतात. या संस्थांमधून बाहेर पडणारे पदवीधर हे नोकरी योग्य असतात याचे मूळ कारण म्हणजे स्वायत्तेमुळे विषय, अभ्यासक्रम आणि शिकविण्याच्या पद्धतीत काळानुसार व गरजेनुसार बदल घडवून आणतात.

भारतात स्वातंत्र्यानंतर शिक्षणामध्ये बरेच बदल झाले विकास व वाढ झाली परंतु त्यामागे योग्य नियोजनाचा अभावच जाणवतो. सुरुवातीच्या काळात पारंपारिक शिक्षणावर भर देण्यात आला. त्या मानाने व्यवसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था फारच कमी होत्या. अशा या असमतोल वाढीमागे सरकारचे धोरणच कारणीभूत आहे. सरकारने विद्यार्थींना उच्चशिक्षणाची जास्तीत जास्त संधी मिळावी याकरिता शिक्षण संस्था काढल्या ही गोष्ट चांगली केली पण उद्योग वाढीसाठी एकतर्फी निर्णय घेतले.

## ४. उच्चशिक्षणातील आव्हाने:

जागतिकीकरणाने एकीकडे आपल्यासमोर आव्हाने उभी केली आहे. तर दुसरीकडे संधीची विपुलताही निर्माण केली आहे. ती आव्हाने स्वीकारण्याची ताकद मिळविण्यासाठी दर्जेदार शिक्षणाची संधी सामान्य स्तरावरील मूल-मुलींना मिळाली पाहिजे.आज खाजगी शिक्षण संस्था यांनी हे आव्हान स्वीकारले आहे परंतु ते शिक्षण सामान्य कुटुंबातील मुला-मुलींच्या आवाक्या बाहेरील आहे. प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे असल्यामुळे ते वंचित घटकांना मिळेल, पण माध्यमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे असणार नाही आणि होणारही नाही पण ते सामान्य लोकांच्या आवाक्या बाहेरचे असू नये. शिक्षणामधून बौद्धिक, भावनिक, नैतिक विकास व्हायला पाहिजे त्यांचा बुध्यांक (IQ) वाढायला पाहिजे, भावनांक (EQ) आणि नैतिकांक (MQ) देखील वाढणे आवश्यक आहे. यालाच व्यक्तिमत्वाचा संतुलित विकास मानता येईल. व्यक्तिमत्वाच्या संतुलित विकासासाठी शिक्षण पद्धती देखील संतुलित असली पाहिजे त्यासाठी अभ्यासक्रमांमध्ये बदल करावे लागतील. तसेच शिक्षकांच्या प्रशिक्षणातही बदल करावा लागेल. आजच्या शिक्षणात बुद्धि हा घटक खूप महत्वाचा मानला गेलेला आहे.तसेच भावना व नैतिक मूल्ये यांनाही जीवनात फार मोठे स्थान आहे पण त्याकडे लक्ष दिले जात नाही. बुद्धि भावना व नैतिकता या तीनही घटकांना शिक्षण पद्धती मध्ये सारखेच मानले गेले पाहिजे. तरच व्यक्तीला सम्यक विचार व सम्यक दृष्टी लाभणार आहे.

जागतिकीकरणांचा सर्व राष्ट्रांच्या शिक्षणपद्धतीवर परिणाम झालेला दिसून येतो. इंग्रजीला जागतिक भाषा म्हणून मान्यता मिळाली आहे. इंग्रजी ही जगाची ज्ञानभाषा आहे, प्रत्येक देशात पहिल्या इयत्तेपासून इंग्रजी भाषा शिकवली जाते, त्यामुळे प्रादेशिक भाषांचे महत्त्व कमी झाले आहे, त्यामुळे निरनिराळ्या बोलीभाषा व संस्कृती यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. आपली ओळख आणि अस्मिता, स्वत्व व सर्वस्व टिकविण्याची धडपड आपल्या शैक्षणिक धोरणात प्रतिबिंबित झाली पाहिजे. आपण आपला सांस्कृतिक वारसा जतन करायला पाहिजे. आपले साहित्य, भाषा, कला, संस्कृती, तत्वज्ञान व इतिहास हा सर्व आपला ठेवा आहे. त्यात आपल्या प्रेरणा स्वत्व दडलेले आहे. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचे संवर्धन व संक्रमण व्हायला हवे खरे तर ते आपले राष्ट्रीय कर्तव्यच आहे. कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्रांचा अवलंब करण्याची शिफारस केली होती, त्याचा स्वीकारही शासनाने केला होता. मातृभाषा, राष्ट्रभाषा हिंदी आणि संपर्क भाषा इंग्रजी हे सूत्र आम्ही अंमलात आणण्याचा प्रयत्न केला, पण या प्रयत्नाला सातत्य लाभले नाही. आम्ही विपुल प्रमाणात पाठ्यपुस्तके आणि संदर्भग्रंथ निर्माण करू शकलो नाही. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आम्ही प्रादेशिक भाषांमध्ये देत आहोत, मात्र उच्च शिक्षण प्रादेशिक भाषेमध्ये देण्याचे धाडस आम्ही दाखवले नाही. कला आणि वाणिज्य शाखेतील विषय आम्ही कसेबसे प्रादेशिक भाषांमध्ये शिकवत आहोत, विज्ञान तंत्रज्ञान प्रादेशिक भाषांमध्ये शिकवणे शक्य झाले नाही. व्यवसायिक, अभियांत्रिकीय, वैद्यकीय व्यवस्थापन शास्त्रविषयक अभ्यासक्रम इंग्रजीत शिकवणे भाग होत आहे. थोडक्यात प्रादेशिक भाषांचा विकास ज्ञानभाषा म्हणून आम्हाला करता आलेला नाही.

जागतिकीकरणाच्या काळात सर्वच स्तरावरचे व सर्व प्रकारचे शिक्षण इंग्रजी भाषेत देण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत, माहिती तंत्रज्ञानाचा महापूर इंग्रजी भाषेतून वाहतो आहे, त्यामुळे प्रादेशिक भाषा ह्या बोली भाषा बनतील आणि बोलीभाषा ह्या हळूहळू नामशेष होतील. त्या टिकवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली पाहिजे. शिक्षणाच्या संदर्भात त्याचा विकास व विस्तार जर कोणी केला असेल तर त्याचे उत्तम उदा. म्हणून आपल्याला चीन हा देश मार्गदर्शक ठरू शकतो. चीनने शिक्षणप्रसारावर फार मोठा भर दिला. शिक्षण प्रणालीमध्ये मानव संसाधनाचा त्याने पद्धतशीरपणे विकास केला. शिक्षणाला कौशल्याची जोड दिली शिक्षणामध्ये उपयोजितता व रोजगाराभिमुखता आणली आणि भविष्यावर लक्ष ठेवून त्यांनी विकासाचा मार्ग आखला. राष्ट्राचा विकास करायचा असेल तर नियोजन हवे आणि त्यात शिक्षणाला सर्वात वरचे स्थान दिले पाहिजे, राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रात शिकलेली कुशल माणसे पेरणे आवश्यक आहे, चीनच्याच एका तत्त्ववेत्याने गतकाळात सांगून ठेवले आहे की, एका वर्षाची तरतूद करायची असेल तर धान्य पेरा, दहा वर्षाची तरतूद करायची असेल तर झाडे लावा, आणि शंभर वर्षाची तरतूद करावयाची असेल तर लोकांना शिकवा. भारताला नियोजन करायचे असेल तर लोकांना शिकवलेच पाहिजे, ज्ञान हे खरे भांडवल आहे आणि त्याची गुंतवणूक

अधिक प्रमाणात करण्याची आवश्यकता आहे. ज्ञान हेच विकासाचे मूलभूत संसाधन आहे आणि त्याचे संवर्धन व संक्रमण शिक्षण संस्थांच्या प्रांगणात होते, त्यामुळे सर्व सत्तांमध्ये राजकीय सत्ता, आर्थिक सत्ता, ज्ञानसत्ता व सांस्कृतिक सत्तांमध्ये सर्वसामान्य लोकांना भागीदारी मिळायला हवी, त्यांना त्याचे दर्जेदार शिक्षण देणे आवश्यक आहे. चांगले व सृजनशील नेतृत्वासाठी नेतृत्वगुण निर्माण करू शकेल असे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. सर्व मूल्यांचा अंतर्भाव शिक्षणप्रणालीत करायला पाहिजे आणि जागतिकीकरणामध्ये टिकायचे असेल तर जागतिक दर्जाचेच शिक्षण द्यायला हवे.

## संदर्भग्रंथ:

१. डॉ. जनार्दन वाघमारे, (२०१२)"लोकशाही आणि शिक्षण"
२. शि. जे. कृष्णमूर्ती, (१९९४)"शिक्षण जीवन रहस्य"
३. कृष्णराव हनवते,(२०१२)"शिक्षण प्राचीन आणि अर्वाचीन"
४. डॉ. के. के. जाधव, (२०१०) "नवीन काळातील शिक्षण: तत्त्वज्ञान व समाजशास्त्र"
५. डॉ. जनार्दन वाघमारे, (२०१२) "बदलते शिक्षण, स्वरूप आणि समस्या"
६. डॉ.शेवतेकर.,डॉ बडवे, (२०१९) "शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि व्यवस्थापन"